शुक्रवार, दि. २० मार्च २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १९९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

राज्यस्तरीय जिजाऊ कबड्डी चषकात रोमहर्षक लढती

## जालना शहर, मुंबई उपनगर आणि सांगलीची विजयी सलामी

**जालना । प्रतिनिधी -** राज्यस्तरीय जिजाऊ कबड्डी चषक स्पर्धेचा १८ मार्च रोजी सायंकाळी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. रात्री उशिरापर्यंत सामने रंगले. पहिल्या दिवशी झालेल्या कुमारी गट (मुली) आणि कुमार गट (मुले) या दोन्ही विभागांतील सामन्यांमध्ये खेळाडूंनी अटीतटीची झुंज दिली. यात जालना शहर, मुंबई उपनगर, सांगली आणि परभणी या संघांनी दमदार कामगिरी करत विजय नोंदवले.

मुलींच्या गटात मुंबई उपनगर आणि पालघर यांच्यात झालेला सामना अत्यंत चुरशीचा ठरला. यात मुंबई उपनगर संघाने २४ गुण मिळवून पालघरवर केवळ १ गुणाने निसटता विजय मिळवला. दुसऱ्या सामन्यात यजमान जालना शहर संघाने धाराशिवचा ५५-३३ अशा २२ गुणांच्या मोठ्या फरकाने पराभव करत आपले वर्चस्व सिद्ध केले. तर तिसऱ्या सामन्यात सांगलीने बीडवर ४५-१७ अशा २८ गुणांच्या फरकाने मात करत विजय नोंदवला.

मुलांच्या गटातही सर्वच सामने शेवटच्या क्षणापर्यंत रंगतदार झाले. पहिल्या सामन्यात अहिल्यानगरने पालघरचा ४५-३० असा १५ गुणांनी पराभव केला. दुसऱ्या सामन्यात परभणीने सांगलीवर ४२-४० अशा केवळ २ गुणांच्या फरकाने विजय मिळवत सर्वांचे लक्ष वेधले. मुंबई उपनगर आणि जालना शहर यांच्यातील लढतीत मुंबईने ४६-४२४ अशा ४ गुणांच्या फरकाने बाजी मारली. तर शेवटच्या सामन्यात बीडने छत्रपती संभाजीनगरचा ५८-५३ असा ५ गुणांच्या फरकाने पराभव करत विजय मिळवला.

या सर्व सामन्यांचे नियोजन पंच प्रमुख प्रा. डॉ. फुलचंद कदम (धाराशिव) आणि सहपंच प्रमुख प्रा. व्ही. जे. पाटोळे (जालना) यांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत पारदर्शक पद्धतीने करण्यात आले. स्पर्धेच्या पुढील फेरीत कोणते संघ बाजी मारतात, याकडे आता क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे. दरम्यान, गुरुवार दि. १९ मार्च रोजी दुसऱ्या दिवशीचे सामने पावसामुळे होऊ शकले नाहीत. त्यामुळे शुक्रवारी सकाळी ८ वाजेपासून सामन्यांना सुरुवात होणार असल्याचे संयोजकांतर्फे कळविण्यात आले आहे.

या चषकाच्या यशस्वीतेसाठी स्पर्धेचे मुख्य संयोजक महात्मा फुले सामाजिक कार्य सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष प्रा. सत्संग मुंडे, सहसंयोजक विजय कामड, आयोजन समितीचे पदाधिकारी सुदामराव सदाशिवे, ॲड. शिवराम सतकर, सुभाष कोळकर, देवराव सोनवणे, ओमप्रकाश चितळकर, अरविंद देशमुख आणि राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांच्या संयोजन समितीचे पदाधिकारी, सदस्य विशेष परिश्रम घेत आहेत.



युवा आदर्श

### प्रकट दिन ...

नाव घेता प्रकट होई
प्रकटदिन हरेक दिन
समर्थ समर्थ बोलता
सबल हो दुर्बल दीन
भजना तुझ्या दंगता
विणली रेशीम वीण
कोण तारी भवसागरी
समर्था गा तुज वीण
भक्तीची शक्ती अशी
षड्रिपु होतीलं क्षीण
गाळता मौक्तीकघाम
क्षणार्धात जाई शीण
पिलांची घेई काळजी
जशी माऊली पक्षीण
तसेस्वामी तुम्हीपाठी
साक्षात मनो कांक्षीण
विरोधात उभे ठाकते
आपली पातके वैरीण
नाम स्मरण पुण्यवान
जाळेलं ती राक्षशीण
पर्वतासम ते उपकार
कसे फिटायचे हे रीण
गुरू वसे जरी हृदया
कस्तुरी शोधते हरीण
स्वामींचे नामस्मरणात
सहजते होतो तल्लीन
कधी ने अक्कलकोटी
असे सगळे स्वामीधीन

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

**झाडे लावा**

**झाडे जगवा**

'त्या' प्रकरणात चौकशी अहवाल सादर न केल्याने उपअभियंत्यांना नोटीस

## चौकशीत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासन कारवाई करणार का?

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा परिषद बांधकाम विभागातील सहाय्यक लेखाधिकाऱ्यांच्या दालनात एका पत्रकाराला अर्वाच्य भाषेत शिवीगाळ व धक्काबुक्की केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी संबंधित गुत्तेदारावर कारवाई करण्याऐवजी चौकशीत दिरंगाई करणाऱ्या उपअभियंत्यांना कार्यकारी अभियंत्यांनी कडक शब्दात स्मरणपत्र धाडून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

नेमकी घटना काय?

मिळालेल्या माहितीनुसार, जनविश्वासचे संपादक भरत मानकर हे ३ फेब्रुवारी २०२६ रोजी दुपारी १ ते १.३० च्या दरम्यान बातमीच्या संदर्भात माहिती घेण्यासाठी सहाय्यक लेखाधिकारी श्री. हारुण यांच्या केबिनमध्ये बसले होते. यावेळी श्री. बांगड नावाच्या गुत्तेदाराने तिथे येऊन मानकर यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत धक्काबुक्की केली, तसेच त्यांना जिवे मारण्याची धमकीही दिली. याशिवाय गुत्तेदार बांगड यांच्या कामात मोठ्या प्रमाणात अनियमितता असल्याची तक्रारही मानकर यांनी जिल्हा परिषदेकडे केली होती.

प्रशासकीय दिरंगाईवर ओढले ताशेरे

या गंभीर घटनेनंतर बांधकाम विभागाने २७ फेब्रुवारी २०२६ रोजी उपअभियंत्यांना (जी.प. उपविभाग भोकरदन/जाफ्राबाद) या प्रकरणाची स्थळपाहणी करून ८ दिवसांत चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. मात्र, विहित मुदत उलटूनही अद्याप अहवाल सादर न केल्याने कार्यकारी अभियंता सविता शालगर यांनी संताप व्यक्त केला आहे.

कार्यकारी अभियंत्यांचा इशारा

शालगर यांनी उपअभियंत्यांना पाठवलेल्या स्मरणपत्रात स्पष्ट म्हटले आहे की, ''आपण तात्काळ संबंधित मुद्द्यांवर सखोल चौकशी करून अहवाल सादर करावा. यापुढे विलंब झाल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी आपली असेल.''

या पत्रामुळे आता बांधकाम विभागात खळबळ उडाली असून, संबंधित गुत्तेदाराला पाठीशी घालणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आणि चौकशीत दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यांवर प्रशासन काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.





**जालना शहरात अचानक बदलले हवामान; ढगाळ वातावरणानंतर जोरदार पावसासह गारपीट, नागरिकांची धावपळ झाली. (छायाचित्र किरण खानापुरे)**

मराठा महासंघ आणि क्रांती मोर्चाने ईफ्तार पार्टीतून दिला सलोख्याचा संदेश

## रोजांमुळे संयमाचे प्रशिक्षण मिळते - मौलाना मुफ्ती फईम

**जालना । प्रतिनिधी -** ''आपल्या मुखातून इतरांविषयी अपशब्द निघणार नाही. दुसऱ्याचे वाईट आपल्या हातून घडणार नाही, विचारधारा चांगली राहील, अल्लाह विषयी भय निर्माण करण्याचा रमजान महिना असून मनाला जितके दाबले तितके मन नियंत्रित राहते. मनावर संयम कसे ठेवावे याचे प्रशिक्षण रोज्यातून मिळते'' असे महत्व मौलाना मुफ्ती फईम साहेब यांनी विषद केले.

पवित्र रमजान निमित्त प्रतिवर्षाप्रमाणे सलग पाचव्या वर्षी मराठा महासंघ आणि मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने मंगळवारी ( ता.१७) सायंकाळी गांधी चमन येथे ईफ्तार पार्टीचे आयोजन करत सामाजिक ऐक्य आणि सलोख्याचा संदेश दिला.या प्रसंगी मौलाना मुफ्ती फईम साहेब,मौलाना रऊफ साहेब, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी, ज्येष्ठ नेते एकबाल पाशा, नवाब डांगे, शेख मेहबूब, व्यापारी महासंघाचे जिल्हाध्यक्ष विनीत साहनी, जमाते इस्लामी हिंदचे अध्यक्ष शेख मुजीब, मराठा महासंघाचे राष्ट्रीय विभागीय चिटणीस अरविंद देशमुख, मराठा क्रांती मोर्चाचे किशोर मरकड ,विश्वंभर तिरुखे पाटील, अशोक पडूळ, सुभाष चव्हाण,फेरोज अली मौलाना,अहेमद नूर,एम .आय. एम. चे जिल्हाध्यक्ष शेख माजेद, काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष अतिक खान ,माजी नगरसेवक विजय पवार, शेख शकील,कॉ. सगीर अहमद ,शेख हबीब, मिर्झा अनवर बेग ,ईसा पठाण,शेख इब्राहिम, शेख चांद पी.जे.यांची प्रमुख उपस्थिती होती.

एकबाल पाशा यांनी अफगाणिस्तानातील निष्पाप डॉक्टर्स आणि रुग्णांची हत्या करणाऱ्या पाकिस्तानचा जाहीर निषेध केला.

शेख मुजीब यावेळी म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेला सर्वधर्मसमभावाचा खरा वारसा अरविंद देशमुख यांनी जोपासला आहे. कुराणचे मराठीतील भाषांतर त्यांच्या हस्ते करण्यात आल्याचे मुजीब यांनी सांगितले.

मौलाना रऊफ साहेब,फ`रोज अली मौलाना, शेख जाकेर यांची समायोचित भाषणे झाली. सूत्रसंचालन अशोक पडूळ यांनी केले तर किशोर मरकड यांनी आभार मानले. यावेळी सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक शेख इस्माईल, डॉ.रोहित देशमुख, ॲड.शैलेश देशमुख,शुभम टेकाळे,मंगेश मोरे ,मंगेश देशमुख, अमोल भोसले, सुदर्शन देशमुख, वहीद चाऊस,शेख वसीम, साबेर खान, शेख जावेद ,अमजद खान, यांच्यासह मराठा व मुस्लिम समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

**आदर्श वस्तुपाठ - कुलकर्णी**

इस्लाम धर्मातील पाच तत्वांचे पालन रमजान महिन्यात केले जाते. निर्धार, सहनशीलता आणि सहनशक्ती निर्माण करण्याची शिकवण मिळते. मराठा महासंघाचे अरविंद देशमुख यांनी मागील पाच वर्षापासून इतर पार्टीचे आयोजन करून समाजात आदर्श वस्तू पाठ निर्माण केला आहे असे नमूद करत उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांनी रमजान ईद सण उत्साह आणि आनंदात साजरा करावा असे सांगितले.

### मुस्लिम समाजाने सहकार्य केले - देशमुख

मराठा आरक्षण लढाईसाठी योद्धे मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईकडे मराठा समाज बांधव जात असतांना मुंबईसह महाराष्ट्रातील अन्य ठिकाणी मुस्लिम समाज बांधवांनी मस्जिदी खुल्या करत व्यवस्था केली. अशी आठवण करून देत अरविंद देशमुख म्हणाले, मुस्लिम समाज बांधवांचे सहकार्य आम्ही कधीच विसरणार नाही. आपण कट्टर हिंदू म्हणून काम करत असलो तरी दुसऱ्या धर्माचा आदर करणे याची शिकवण हिंदू धर्मात मिळते. भगवा हा कुठल्याही जातीचा, पक्षाचा नसल्याचे देशमुख यांनी सांगितले.



## संपादकीय पान

# चवदार तळ्याचा सत्याग्रह !

२० मार्च हा दिवस भारताच्या सामाजिक इतिहासाला कलाटणी देणारा दिवस आहे. कारण याच दिवशी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रायगड जिल्ह्यातील महाड येथील चवदार तळ्यावर अस्पृश्यांना पाणी घेता यावे म्हणून सत्याग्रह केला. हा महाडचा सत्याग्रह, चवदार तळ्याचा सत्याग्रह किंवा मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो. म्हणूनच २० मार्च हा दिवस भारतात सामाजिक सबलीकरण दिन म्हणून साजरा केला जातो. हा सत्याग्रह फक्त महाराष्ट्रालाच नाही तर जगाला प्रेरणा देणारा ठरला. पाणी ही नैसर्गिक संपत्ती आहे. तिच्यावर सर्वांचा समान हक्क असताना त्या काळच्या जातीय व्यवस्थेने मुख्य स्रोतातून पाणी घेण्यास व रस्त्यावरुन जाण्यासही अस्पृश्यांना बंदी घातली. ४ ऑगस्ट १९२३ साली ब्राह्मणेतर पक्षाचे नेते सी के बोले यांनी मुंबई कायदे मंडळात एक कायदा पास करुन घेतला. त्यानुसार सरकारी खर्चाने बांधलेल्या व सुस्थितीत असलेल्या मालमत्तेवर म्हणजे पाणवठे, धर्मशाळा, बगीचे यावर सर्वांचाच म्हणजे अस्पृश्यांचा देखील अधिकार असेल. जानेवारी १९२४ साली महाडच्या नगरपालिकेने या कायद्याची अंमलबजावणी करण्याचा ठराव केला. या ठरावानुसार नगरपालिकेने महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले केल्याचे जाहीर केले. परंतु स्पृश्यांनी अस्पृश्यांना या तळ्यातून पाणी भरू दिले नाही. त्यामुळे अस्पृश्यांमध्ये धाडस आणि आत्मविश्वास निर्माण करू देण्यासाठी व त्यांचा हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी चवदार तळ्यातील पाण्यासाठी सत्याग्रह करण्याचे ठरवले. बाबासाहेबांनी १९ आणि २० मार्च या दिवशी महाडमधील कुलाबा येथे परिषद भरवली. या परिषदेचे अध्यक्ष स्वतः बाबासाहेब हे होते. या परिषदेस सुरेंद्र चिटणीस, संभाजी गायकवाड, अनंत चित्रे, रामचंद्र मोरे, गंगाधर पंत सहस्त्रबुद्धे हे दलितेतर व ब्राह्मण नेते उपस्थित होते. या परिषदेत अस्पृश्यतेचा धिक्कार करुन काही ठराव करण्यात आले ते असे १) स्पृश्यांनी अस्पृश्यांना आपल्या नोकरीत ठेवावे., २) स्पृश्य लोकांनी अस्पृश्य लोकांचे नागरिकत्वाचे अधिकार मान्य करावेत., ३) मृत जनावरे ज्याची त्याने ओढवित, ४) स्पृश्यांनी अस्पृश्य विद्यार्थ्यांना वार लावून जेवण द्यावे. याच परिषदेत असेही ठरले की सर्वांनी दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च रोजी महाडच्या चवदार तळ्यातील पाणी प्यावे. त्यानुसार दुसऱ्या दिवशी परिषदेस उपस्थित असणारे सर्व नेते व परिषदेस आलेले सर्व जण चवदार तळ्यावर गेले. डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी सर्वप्रथम या तळ्यातील पाणी ओंजळीने प्यायले. त्यावेळी स्त्री पुरुष ५००० लोक या परिषदेस व त्यानंतर चवदार तळ्यावर पाणी पिण्यासाठी आले. त्यातील पुरुष हे हातात काठी घेऊन आले होते. हातात काठी म्हणजे महार जातीच्या पुरुषाचे चिन्ह होते. चवदार तळ्याचे पाणी पिऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी अस्पृश्यांना मुक्तीचा मार्ग दाखवला. पण, ही मानवतावादी घटना रूढीवादी स्पृश्य हिंदूंना सहन झाली नाही. डॉ बाबासाहेब आंबेडकर सरकारी बंगल्यात परत गेल्यावर जातीयवादी, सनातनी विचारांच्या लोकांनी गावात अफवा उठवली की, चवदार तळे बाटवल्यानंतर डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखालील जमाव विश्वेश्वराच्या मंदिरात जाऊन मंदिरही बाटवणार आहेत. धर्म धोक्यात आल्याचे उच्चवर्णीय, सनातनी हिंदूंनी गावभर पसरवले त्यातून जातीयवादी उच्च हिंदूंचा एक घोळका हत्यारे, लाठ्याकाठ्या घेऊन सभास्थानी आला. त्यांनी सभेनंतर गावाकडे जाण्यापूर्वी जेवण करीत असणाऱ्या अस्पृश्यांना मारहाण केली. त्यांच्या जेवणात माती मिसळली. विश्वेश्वराच्या मंदिरात प्रवेश करण्याचा कट रचला आहे अशी अफवा उठवल्यामुळे गावातील सनातनी हिंदूंनी सत्याग्रहासाठी आलेल्या लोकांवर हिंसा केली. परंतु , अहिंसा हे तत्व मानणाऱ्या आंबेडकरांनी अस्पृश्य सत्याग्रहींना सनानती हिंदूंविरुद्ध हिंसा करु नका असा आदेश दिला होता, त्यामुळे एव्हढी हिंसा होऊनही आणि प्रत्यक्षात स्थानिकांपेक्षा संख्येने जास्त असूनही काठीधारी अस्पृश्यांनी संयम बाळगला. अस्पृश्यांनी तळे बाटवले म्हणून सनातनी, जातीयवादी हिंदूंनी गोमूत्र टाकून ब्राह्मणांकडून तळ्याचे शुद्धीकरण करुन घेतले. पुढे महाडच्या नगरपालिकेने स्थानिकांच्या दबावाला बळी पडून अस्पृश्यांना चवदार तळे खुले करण्याचा ठरावही रद्द केला. त्यामुळे बाबासाहेबांनी २५ आणि २६ डिसेंबर रोजी रोजी महाड येथे परिषद घेण्याचे ठरवले. या परिषदेचा उद्देश स्पष्ट करताना डॉ बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, आतापर्यंत आम्ही या तळ्याचे पाणी पिऊ शकलो नाही किंबहुना आम्हाला पिऊ दिले नाही, आता आम्ही या तळ्याचे पाणी प्यायलो म्हणजे आमचे सर्व दुःख नष्ट होईल, आमची सर्व परिस्थिती सुधारेल, आमच्यावरील अन्याय कमी होईल असे काही नाही. हा सत्याग्रह म्हणजे केवळ एका मानवाने दुसऱ्या मानवाला समानतेने कसे वागवावे हे सांगण्याचा व सर्व मानवाला समानतेचा अधिकार आहे हे दाखवण्याचा प्रयत्न आहे. समतेची मुहूर्तमेढ रोवण्यासाठी जगाच्या पाठीवर पिण्याच्या पाण्यासाठी केलेला हा एकमेव सत्याग्रह आहे म्हणूनच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह मानव मुक्तीचा सत्याग्रह म्हणून ओळखला जातो.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

# आई चिमणीचे नाव घेऊन घास भरवायची; आज चिमण्यांना वाचविण्याची जबाबदारी आपल्यावर

जागतिक चिमणी दिवस साजरा करतांना चिमण्यांना व संपूर्ण पशुपक्ष्यांना कशा पध्दतीने वाचविता येईल यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. चिमण्यांना रहाण्याकरीता घरटे नाहीत याकरिता वृक्षारोपण व्हायला हवे, उन्हाळ्यात चिमण्यांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. त्यामुळे आतापासूनच जीथे-जीथे चिमण्या येवू शकतात तीथे-तीथे किंवा आपल्या घराच्या भिंतीवर किंवा घरावर एखाद्या तबकड्यात पाणी अवश्य ठेवावे सोबतच खाण्याकरिता थोडे तांदळाचे दाणे किंवा खाद्य टाकावे. कारण चिमण्यांना खरोखरच आपली नितांत गरज आहे. अन्यथा ज्या चिमण्या दिसतात त्या सुध्दा लुप्त होवू शकतात याला नाकारता येत नाही.कारण दिवसेंदिवस चिमण्यांसह इतरही पक्षांचे प्रमाण कमी-कमी होतांना दिसत आहे. चिमण्यांच आपल्या मानव जातीवर खुप मोठे उपकार आहेत ते तर आपण फेडुच शकत नाही.परंतु आज बदलत्या काळानुसार व बदलत्या हवामानामुळे त्यांच्यावर मोठे संकट ओढावले आहे. त्यातुन मुक्त करण्यासाठी थोडा हातभार आपण लावु शकतो याकरिता पाण्याची सोय व खाद्यान्नाची सोय सर्वांनीच आपापल्या परीने केली पाहिजे. चिमण्यांच्या अनुषंगाने अनेक पक्षी पाण्याचा व खाद्यान्नाचा स्वाद अवश्य घेतील आणि आयुष्य वाढेल व चिमण्यांचा किलबिलाट सर्वत्र दिसून येईल.जगातील चिमण्यांची घटती संख्या लक्षात घेता जगातील देशांनी चिमण्यांना वाचविण्याच्या दृष्टीकोनातून जागतिक चिमणी दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. याकरीता २० मार्च ही तारीख ठरविण्यात आली आणि राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने पहिला जागतिक चिमणी दिवस २० मार्च २०१० ला साजरा करण्यात आला. भारतात सगळीकडे सर्वात जास्त संख्येने सापडणारा, मानसाच्या जवळपास वावरणारा व नेहमी डोळ्यांनी दिसणारा पक्षी म्हणून चिमणीची भारतभर चांगलीच ओळख आहे.आज जगातील बदलत्या तापमानामुळे व हवामानामुळे, युद्धजन्य परिस्थिती,परमाणू परिक्षण, वाढते औद्योगिकीकरण, मोबाईलचे टॉवर,वाढते शहरीकरण, जंगलतोड, शेतातील रासायनिक खतांचा वापर व किटकनाशके,वणवे लागणे,ध्वनी प्रदुषण, पाणथळ्यांच्या जागा नष्ट झाल्याने आणि जगातील वाढती यूध्दजन्य परिस्थिती यामुळे चिमण्यांसह अन्य पशु-पक्षांचे जगणे अत्यंत कठीण झाले असुन धोकादायक स्थितीत आहे.यामुळे अनेक पशु-पक्षी लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत. आज जंगल तोडीमुळे जंगलातील पशु-पक्षी शहराकडे धाव घेतांना दिसते. हा संपूर्ण प्रकार निसर्गाचा होत असलेल्या ह्रासामुळे दिसून येतो व मानवजातीच्या अतीक्रमनामुळे निर्माण झाला आहे.पुर्वी कवेलुचे घर असायचे, मातीच्या भिंती असायच्या त्यामुळे चिमण्या आपले घरटे कुठे तरी अवश्य बनवायचे. कारण कवलाचे घर व मातींच्या भिंती नेहमी थंड असतात याचा सहारा घेऊन रहायचे.त्यामुळे प्रत्येक घरामध्ये आपल्याला चिमण्यांचे घरटे अवश्य दिसायचे व चिमण्यांचा मधुर किलबिलाट ऐकू यायचा.यावरून सकाळचा काय वेळ झाला आणि संध्याकाळचा काय वेळ झाला हे त्यांच्या किलबिलाट वरून ताबडतोब सर्वांनाच लक्षात यायचे.परंतु आज चिमण्यांचा किलबिलाट नामशेष झाल्याचे दिसून येते. आज चिमण्यांना घरटे बांधण्यासाठी योग्य जागा मिळत नाही, पाण्यासाठी वणवण हिंडावे लागते अशी भयावह परिस्थिती आज चिमण्यांची झाली आहे.आज घरांचे सिमेंटीकरण झाल्याने चिमण्यांना घरटे बांधण्यास मोठा संघर्ष करावा लागतो आहे.वाढत्या प्रदुषणांमुळे व उष्णतामानामुळे चिमण्यां व इतर पशु-पक्षांना हवेत मोकळा स्वास सुध्दा मिळु शकत नाही.अशी कठीण व गंभीर परिस्थिती पशु-पक्षांवर असलेली आहे. आपण चीनचा विचार केला तर १९५८-६२ या कालावधीत चार किटक मोहिम राबविण्यात आली त्यात पिकांचा नाश करणाऱ्या घटकांना म्हणजे उंदीर,माश्या,डास आणि चिमण्या हे चार नष्ट करायचे सरकारने ठरविले.यामुळे चीनमध्ये चिमण्या जवळपास संपुष्टात आल्याचे दिसून येते. त्यामुळे याचा गंभीर परिणाम चीनच्या पर्यावरणावर झाला आहे. यानंतर पक्षी तज्ज्ञांनी अभ्यासाच्या अंती सांगितले की चिमणी पर्यावरणाच्या दृष्टीने जगाला आवश्यक आहे. जगभरात २६ जातिंच्या चिमण्यांची नोंद आहे.परंतु यातील अनेक चिमण्यांच्या जाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. जगातील पक्षांचा विचार केला तर ८६७ प्रजाती आहेत.परंतु गेल्या पंचवीस वर्षांत आतापर्यंत पक्षांच्या संख्येने सर्वात मोठी घट झाली आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. त्याचप्रमाणे कीटकभक्षी चिमण्यांची संख्या कमी होने अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.कारण चिमण्यांची घटती संख्यांचा प्रश्न सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर परिणाम करणारा आहे. कारण पिकांवर पडणाऱ्या अळ्या आणि किटक चिमण्या खायच्या परंतु चिमण्यांच्या घटत्या संख्येमुळे पिकांवर सुध्दा दुष्परिणाम होतांना दिसतो. एकेकाळी चिमणी हा आपला अत्यंत महत्त्वाचा पक्षी होता कारण लहान मुले जेवणाकरीता कंटाळा करायचे तेव्हा आपली आई किंवा आजी चिमणीची आठवण अवश्य करायची व लहान मुले पोटभर जेवण सुध्दा करायची.''चिऊताई-चिऊताई चारा खा, पाणी पी आणि भुर्र उडून जा'' असे म्हणत आपला घास भरत यामुळे आपलं बालपण समृद्ध झाले.कारण आई व आजी इतर पक्षांची ओळख करून देतांना चिऊताईचा लाड जास्तच करायची. चिमण्यांनी आपल्याला बरेच काही दिले त्यामुळे आज त्यांना आपल्या कडून फक्त पाण्याची अपेक्षा आहे ती आपण अवश्य पुर्ण करू या.जागतिक चिमणी दिवसाचे औचित्य साधून भारतासह जगातील संपूर्ण देशांनी आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपणाचा संकल्प करावा व वृक्षारोपण करावे.यामुळे गुरांना चारा,पशु-पक्षांना रहाण्यासाठी घरट्यांसाठी जागा उपलब्ध होईल, मानवाला शुद्ध हवा व ऑक्सिजन मिळण्यास मोठी मदत होईल.यामुळे पर्यावरण सुधारण्यास मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित राहील आणि जिकडे-तिकडे हिरवागार गालिचा पसरलेला दिसुन येईल. आपण सर्वांनीच चिमण्या वाचविण्याचा संकल्प करूया.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९,**
**नागपूर**

## जालना पोलिसांची मोठी कामगिरी
# बेपत्ता झालेला ५ वर्षांचा मुलगा अवघ्या दीड तासात शोधला




**जालना । प्रतिनिधी -** खेळता खेळता बेपत्ता झालेल्या एका पाच वर्षीय बालकाचा शोध घेण्यात कदीम जालना पोलिसांना अवघ्या दीड तासात यश आले आहे. सीसीटीव्ही फुटेज आणि तत्पर हालचालींच्या जोरावर पोलिसांनी या बालकाला सुखरूप त्याच्या पालकांच्या स्वाधीन केले.

नेमकी घटना काय? आज दिनांक १९ मार्च २०२६ रोजी दुपारी ३:३० वाजेच्या सुमारास जुना जालना भागातील सिद्धिविनायक नगर (फकटनगर जवळ) येथून सम्यक रेड्डी हा ५ वर्षांचा मुलगा गल्लीत खेळत असताना बेपत्ता झाला होता. एका अज्ञात व्यक्तीने त्याला सोबत नेल्याची तक्रार त्याची आई कोमल विजय रेड्डी यांनी कदीम जालना पोलीस ठाण्यात दिली होती.

सीसीटीव्ही फुटेज ठरले मदतीचे

तक्रार प्राप्त होताच पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठांना माहिती दिली आणि तातडीने पथकासह घटनास्थळ गाठले. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले असता, एक अज्ञात व्यक्ती बालकाला घेऊन जाताना दिसली. त्या फुटेजच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम राबवून बालक आणि त्या व्यक्तीला ताब्यात घेतले.

तपासात काय निष्पन्न झाले? संबंधित व्यक्ती आणि मुलाला पोलीस ठाण्यात आणून चौकशी केली असता, ती अज्ञात व्यक्ती मुलाचा नातेवाईक असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी पालक आणि नातेवाईक यांचे जबाब नोंदवून बालकाला सुखरूप त्याच्या आई-वडिलांच्या ताब्यात दिले.

तपास पथक

ही यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

पथकातील सहभागी अधिकारी व कर्मचारी:

पोलीस निरीक्षक जनार्धन शेवाळे

सपोनि आरती जाधव, पोउपनि दिनकर मोरे

पोहेकॉ राठोड, पोना किरण चेके, पोना बाबा गायकवाड

पोकॉ अशपाक शहा, किशोर तराळ, उमेश साबळे, आणि संजय चव्हाण

# राजेवाडी जि. प. प्राथमिक शाळेत विविध उपक्रमांनी प्रवेशोत्सव साजरा



**जालना । प्रतिनिधी -** बदनापूर तालुक्यातील राजेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गुढीपाडवा-प्रवेश वाढवा या संकल्पनेतून प्रवेशोत्सव विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. प्रवेशोत्सवाच्या माध्यमातून पहिलीत प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचे स्वागत करून त्यांना शालेय प्रवाहात सामील करून घेण्यात आले. प्रवेशोत्सवाचे खास आकर्षण म्हणजे नवोदित विद्यार्थ्यांची गावातून सवाद्य मिरवणूक काढण्यात आली. सजवलेल्या वाहनातून निघालेल्या या मिरवणुकीने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

शाळेत आल्यानंतर पहिली वर्गात प्रवेशित विद्यार्थ्यांचे गुलाबाचे फूल देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी मुलांच्या हाताचे ठसे कागदावर घेऊन त्यांचे फोटो भिंतीवर लावण्यात आले. तसेच बालमित्र पुस्तक आणि वही भेट देऊन त्यांना अभ्यासासाठी प्रोत्साहित करण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून शेलगाव येथील जिल्हा परिषद पीएमश्री माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक अरविंद खरात, माजी पंचायत समिती सदस्य प्रताप गुसिंगे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रणजित शेजुळ, उपाध्यक्ष प्रतापसिंह डेहगंळ, सचिव तथा मुख्याध्यापक जगत घुगे, सदस्य कविता धुनावत, उमा गुसिंगे, रोहिणी नायमने, कैलास गुसिंगे, इंदुबाई शेजुळ, परमेश्वर मोठे, योगेश मोरे, राजू घोरपडे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

प्रास्ताविकपर भाषणात मुख्याध्यापक जगत घुगे यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करताना सांगितले की, मराठी नवीन वर्षाच्या मुहूर्तावर तुमचा शालेय प्रवास सुरू झाला आहे, याचा सार्थ अभिमान बाळगावा. शाळेत तुम्हाला दर्जेदार आणि आनंददायी शिक्षण मिळेल. गेल्या तीन महिन्यात शाळेत झालेल्या रचनात्मक बदलांची माहिती देत, आगामी काळात प्रवेश पात्र विद्यार्थ्यांच्या घरोघरी जाऊन पालक संपर्क अभियान राबवणार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परमेश्वर मोरे, वनिता आचार्य, गंगा टेपले, प्रज्ञा चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले. वनिता आचार्य यांनी उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने ग्रामस्थ आणि पालक उपस्थित होते.

# महापौर सौ.सुजाताताई पाटील ह्यांच्या हस्ते यशवंत चव्हाण यांचा सन्मान

**सीबीडी बेलापूर -** येथील क्रिकेटप्रेमींसाठी सीबीडी प्रीमियर लीग २०२६ ची सायंकाळी रात्रीच्या प्रकाशमय क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. राजीव गांधी मैदान येथे स्थानिक तरुणांना क्रिकेटसाठी व्यासपीठ निर्माण करून देणे हा सकारात्मक विचार अमलात आणला गेला. उपस्थित मान्यवरांचे शॉल,बुके, स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.स्थानिक रोखठोक मुक्त पत्रकार श्री यशवंत चव्हाण,यांचा नवी मुंबई महापौर सौ. सुजाता ताई पाटील ह्यांच्या हस्ते आदरपूर्वक सन्मान करण्यात आला. सदर सामन्याला विभागातील व बाहेरील क्रीडा प्रेमींनी गर्दी करून आयपीएल ची आठवण करून दिली.सामन्यात क्रिकेटपटूंचा उत्साह वाढवला.




# मुलखावेगळ्या स्त्रियांचे 'जिचं तिचं आकाश' प्रकाशित

अमेरिकेत आणि भारतात विविध क्षेत्रात मुलखावेगळी कामगिरी करीत असलेल्या स्त्रियांच्या प्रेरणादायी जीवन कथा असणाऱ्या अमेरिका स्थित लेखिका चित्रा मेहेंदळे ह्यांच्या '' जिचं तिचं आकाश '' ह्या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच विले पार्ले ( पूर्व) येथील प्रबोधनकार ठाकरे क्रिडा संकुलाच्या सभागृहात शानदारपणे झाले.

या प्रकाशन सोहोळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ न्यायमूर्ती श्रीमती बागेश्री पारख,अभिनेत्री सुप्रिया सचिन पिळगावकर, ग्रंथालीचे विश्वस्त श्री सुदेश हिंगलासपूरकर, नगरसेविका श्रीमती अंजली सामंत उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान अभिनेत्री रजनी वेलणकर ह्यांनी भूषविले. सौ अलका भुजबळ ह्यांनी बहारदारपणे सूत्रसंचालन करून कार्यक्रमात चांगलीच रंगत आणली.

ह्यावेळी सर्व प्रमुख पाहुण्यांची समयोचित भाषणे झाली. तर श्रीमती रजनी वेलणकर ह्यांनी पुस्तकातील काही कथा नायिकांच्या जीवनाचा संघर्ष उलगडून सांगताना, अत्यंत प्रेरणादायी असे हे पुस्तक आजच्या युवक युवतींनी वाचलेच पाहिजे असे, आवर्जून सांगितले.

प्रारंभी लेखिका चित्रा मेहेंदळे यांनी सर्वांचे स्वागत करून पुस्तकामागील प्रेरणा, पुस्तकाची जडणघडण ह्याबद्दल विस्ताराने सांगितले. आभार प्रदर्शन श्री देवेंद्र भुजबळ यांनी केले.

या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर आणि साहित्य प्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नुकत्याच झालेल्या जागतिक महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसणारे ह्या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे सर्व कथा नायिका,लेखिका, प्रकाशिका, कार्यक्रमाच्या अध्यक्षा ह्या सर्व महिलाच आहेत. ह्या पुस्तकाची निर्मिती ग्रंथाली ने केली असून न्यूज स्टोरी टुडेने प्रकाशन केले आहे.



# संपत्तीच्या वादात डीएनए चाचणी आणि गोपनीयतेचा अधिकार

## राजस्थान उच्च न्यायालयाच्या भूमिकेकडे लक्ष

**जालना । प्रतिनिधी -** वडिलोपार्जित संपत्तीच्या वादात रक्ताचे नाते सिद्ध करण्यासाठी डीएनए चाचणीची सक्ती करता येते का? एखाद्या व्यक्तीच्या गोपनीयतेच्या अधिकारापेक्षा सत्य शोधण्याचा न्यायालयाचा अधिकार मोठा आहे का? या महत्त्वपूर्ण कायदेशीर प्रश्नावर राजस्थान उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून, न्यायालयाच्या निर्णयाकडे संपूर्ण कायदेविश्वाचे लक्ष लागले आहे. श्रीमती भौरी देवी विरुद्ध महेंद्र कुमार आणि इतर (२०२६:-:५७७०) या प्रकरणात ट्रायल कोर्टाने डीएनए चाचणीची मागणी फ ेटाळल्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, याचिकाकर्त्या श्रीमती भौरी देवी यांनी त्यांचे वडील कै. बद्री यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वडिलोपार्जित संपत्तीत हक्क मिळवण्यासाठी दिवाणी दावा दाखल केला. त्यांच्या वडिलांनी मृत्यूपूर्वी केलेले एक मृत्युपत्र रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. मात्र, प्रतिवादी पक्षाने, ज्यात याचिकाकर्त्यांच्या ९३ वर्षीय आई श्रीमती बिला देवी यांचाही समावेश आहे, त्यांनी भौरी देवी ही त्यांची मुलगी असल्याचेच नाकारले. त्यामुळे, आपले रक्ताचे नाते सिद्ध करण्याचे मोठे आव्हान याचिकाकर्त्यांसमोर उभे राहिले.

नातेसंबंध सिद्ध करण्यासाठी आणि वादावर पडदा टाकण्यासाठी, याचिकाकर्त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता च्या ऑर्डर २६, नियम १०-ए अंतर्गत न्यायालयात अर्ज करून त्यांची, त्यांच्या आईची आणि भाऊ असल्याचा दावा असलेल्या रामस्वरूप यांची डीएनए चाचणी करण्याची मागणी केली. मात्र, ट्रायल कोर्टाने दिनांक २४.०२.२०२२ रोजी हा अर्ज फेटाळून लावला. न्यायालयाने म्हटले की, डीएनए चाचणीचा आदेश देणे हे प्रतिवादींच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन ठरेल आणि त्यांनी चाचणीस नकार दिला असल्याने त्यांच्यावर सक्ती करता येणार नाही.

ट्रायल कोर्टाच्या या निर्णयाला याचिकाकर्त्यांनी राजस्थान उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, त्या एक अशिक्षित महिला असून त्यांच्याकडे आपले नाते सिद्ध करण्यासाठी कोणतेही कागदोपत्री पुरावे नाहीत. अशा परिस्थितीत, डीएनए चाचणी हाच एकमेव वैज्ञानिक आणि निर्णायक पुरावा आहे. केवळ गोपनीयतेच्या अधिकाराच्या नावाखाली त्यांना न्याय नाकारला जाऊ नये, कारण येथे मोठ्या संपत्तीच्या हक्काचा प्रश्न आहे. त्यामुळे, सत्य समोर आणण्यासाठी वैज्ञानिक चाचणी आवश्यक आहे.

या कायदेशीर मुद्द्यावर बोलताना, नोटरी असोसिएशन जालनाचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश एस. धन्नावत म्हणाले की, ''हा खटला दिवाणी कायद्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या संघर्षावर प्रकाश टाकतो. एकीकडे भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत प्रत्येक नागरिकाला मिळालेला गोपनीयतेचा आणि शारीरिक स्वायत्ततेचा अधिकार आहे, तर दुसरीकडे न्यायदानासाठी सत्य शोधणे हे न्यायालयाचे परम कर्तव्य आहे. सहसा, न्यायालय कोणावरही वैद्यकीय चाचणीसाठी जबरदस्ती करत नाही. मात्र, वारसा हक्क, पालकत्व किंवा पोटगी यांसारख्या प्रकरणांमध्ये, जिथे नातेसंबंध हाच वादाचा मुख्य मुद्दा असतो, तिथे न्यायालयाला दोन्ही अधिकारांमध्ये संतुलन साधावे लागते. भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम ११२ (आताचा भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३ चे कलम ११०) हे वैध विवाहातून जन्मलेल्या मुलाच्या कायदेशीरपणाबद्दल एक गृहितक मांडते, परंतु या प्रकरणात आईनेच मुलीचे अस्तित्व नाकारल्याने परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे.''

ॲड. महेश एस. धन्नावत पुढे म्हणाले की, ''जेव्हा सत्य सिद्ध करण्यासाठी इतर कोणताही प्रभावी पुरावा उपलब्ध नसेल, तेव्हा वैज्ञानिक पुराव्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे न्यायाच्या तत्त्वाला बाधा आणण्यासारखे आहे. त्यामुळे, या प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल. हा निर्णय भविष्यात अशा प्रकरणांमध्ये डीएनए चाचणीची मागणी, व्यक्तीचा गोपनीयतेचा अधिकार आणि न्यायालयाचे अधिकार यांच्यातील सीमारेषा निश्चित करण्यासाठी एक मैलाचा दगड ठरू शकतो.'' सध्या या प्रकरणाची सुनावणी उच्च न्यायालयात सुरू असून, न्यायालय काय भूमिका घेते यावरच याचिकाकर्त्यांचे भवितव्य अवलंबून आहे.

वडिलोपार्जित संपत्तीच्या वादात रक्ताचे नाते सिद्ध करण्यासाठी डीएनए चाचणीची सक्ती करता येते का? एखाद्या व्यक्तीच्या गोपनीयतेच्या अधिकारापेक्षा सत्य शोधण्याचा न्यायालयाचा अधिकार मोठा आहे का? या महत्त्वपूर्ण कायदेशीर प्रश्नावर राजस्थान उच्च न्यायालयात सुनावणी सुरू असून, न्यायालयाच्या निर्णयाकडे संपूर्ण कायदेविश्वाचे लक्ष लागले आहे. श्रीमती भौरी देवी विरुद्ध महेंद्र कुमार आणि इतर (२०२६:-:५७७०) या प्रकरणात ट्रायल कोर्टाने डीएनए चाचणीची मागणी फ ेटाळल्यानंतर हे प्रकरण उच्च न्यायालयात पोहोचले आहे.

या प्रकरणाची पार्श्वभूमी अशी आहे की, याचिकाकर्त्या श्रीमती भौरी देवी यांनी त्यांचे वडील कै. बद्री यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वडिलोपार्जित संपत्तीत हक्क मिळवण्यासाठी दिवाणी दावा दाखल केला. त्यांच्या वडिलांनी मृत्यूपूर्वी केलेले एक मृत्युपत्र रद्द करण्याची मागणी त्यांनी केली. मात्र, प्रतिवादी पक्षाने, ज्यात याचिकाकर्त्यांच्या ९३ वर्षीय आई श्रीमती बिला देवी यांचाही समावेश आहे, त्यांनी भौरी देवी ही त्यांची मुलगी असल्याचेच नाकारले. त्यामुळे, आपले रक्ताचे नाते सिद्ध करण्याचे मोठे आव्हान याचिकाकर्त्यांसमोर उभे राहिले.

नातेसंबंध सिद्ध करण्यासाठी आणि वादावर पडदा टाकण्यासाठी, याचिकाकर्त्यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता च्या ऑर्डर २६, नियम १०-ए अंतर्गत न्यायालयात अर्ज करून त्यांची, त्यांच्या आईची आणि भाऊ असल्याचा दावा असलेल्या रामस्वरूप यांची डीएनए चाचणी करण्याची मागणी केली. मात्र, ट्रायल कोर्टाने दिनांक २४.०२.२०२२ रोजी हा अर्ज फेटाळून लावला. न्यायालयाने म्हटले की, डीएनए चाचणीचा आदेश देणे हे प्रतिवादींच्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन ठरेल आणि त्यांनी चाचणीस नकार दिला असल्याने त्यांच्यावर सक्ती करता येणार नाही.

ट्रायल कोर्टाच्या या निर्णयाला याचिकाकर्त्यांनी राजस्थान उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी युक्तिवाद केला की, त्या एक अशिक्षित महिला असून त्यांच्याकडे आपले नाते सिद्ध करण्यासाठी कोणतेही कागदोपत्री पुरावे नाहीत. अशा परिस्थितीत, डीएनए चाचणी हाच एकमेव वैज्ञानिक आणि निर्णायक पुरावा आहे. केवळ गोपनीयतेच्या अधिकाराच्या नावाखाली त्यांना न्याय नाकारला जाऊ नये, कारण येथे मोठ्या संपत्तीच्या हक्काचा प्रश्न आहे. त्यामुळे, सत्य समोर आणण्यासाठी वैज्ञानिक चाचणी आवश्यक आहे.

या कायदेशीर मुद्द्यावर बोलताना, नोटरी असोसिएशन जालनाचे कार्याध्यक्ष, ✻✻ॲड. महेश एस. धन्नावत✻✻ म्हणाले की, ''हा खटला दिवाणी कायद्यातील एका अत्यंत महत्त्वाच्या संघर्षावर प्रकाश टाकतो. एकीकडे भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत प्रत्येक नागरिकाला मिळालेला गोपनीयतेचा आणि शारीरिक स्वायत्ततेचा अधिकार आहे, तर दुसरीकडे न्यायदानासाठी सत्य शोधणे हे न्यायालयाचे परम कर्तव्य आहे. सहसा, न्यायालय कोणावरही वैद्यकीय चाचणीसाठी जबरदस्ती करत नाही. मात्र, वारसा हक्क, पालकत्व किंवा पोटगी यांसारख्या प्रकरणांमध्ये, जिथे नातेसंबंध हाच वादाचा मुख्य मुद्दा असतो, तिथे न्यायालयाला दोन्ही अधिकारांमध्ये संतुलन साधावे लागते. भारतीय पुरावा कायदा, १८७२ चे कलम ११२ (आताचा भारतीय साक्ष्य अधिनियम, २०२३ चे कलम ११०) हे वैध विवाहातून जन्मलेल्या मुलाच्या कायदेशीरपणाबद्दल एक गृहितक मांडते, परंतु या प्रकरणात आईनेच मुलीचे अस्तित्व नाकारल्याने परिस्थिती अधिक गुंतागुंतीची झाली आहे.''

ॲड. महेश एस. धन्नावत पुढे म्हणाले की, ''जेव्हा सत्य सिद्ध करण्यासाठी इतर कोणताही प्रभावी पुरावा उपलब्ध नसेल, तेव्हा वैज्ञानिक पुराव्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे न्यायाच्या तत्त्वाला बाधा आणण्यासारखे आहे. त्यामुळे, या प्रकरणात राजस्थान उच्च न्यायालयाचा निर्णय अत्यंत महत्त्वपूर्ण ठरेल. हा निर्णय भविष्यात अशा प्रकरणांमध्ये डीएनए चाचणीची मागणी, व्यक्तीचा गोपनीयतेचा अधिकार आणि न्यायालयाचे अधिकार यांच्यातील सीमारेषा निश्चित करण्यासाठी एक मैलाचा दगड ठरू शकतो.'' सध्या या प्रकरणाची सुनावणी उच्च न्यायालयात सुरू असून, न्यायालय काय भूमिका घेते यावरच याचिकाकर्त्यांचे भवितव्य अवलंबून आहे.

# ऑनलाईन चिमणी गणना आयोजित केली असून चिमणी संवर्धन मोहीमेला सहकार्य करावे - विभागीय वन अधिकारी सुरेश वडोदे

**जालना । प्रतिनिधी -** जागतिक चिमणी दिवस २० मार्च रोजी साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश लोकांमध्ये चिमण्यांविषयी जागरूकता निर्माण करणे आणि त्यांच्या संरक्षणासाठी समाजाला प्रेरित करणे हा आहे. दरवर्षी प्रमाणे या वर्षी पण जागतिक चिमणी दिवसानिमित्त सामाजिक वनिकरण विभाग,जालना , जिल्हा परिषद, जालना व महाराष्ट्र पक्षीमित्र यांच्या संयुक्त विद्यमाने

ऑनलाईन चिमणी गणना आयोजित केली आहे.

खालील लिंकवर क्लिक करून चिमणी संवर्धन मोहीमेला सहकार्य करावे, असे आवाहन विभागीय वन अधिकारी सुरेश वडोदे यांनी केले आहे.

चिमण्या पर्यावरणासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. त्या लहान कीटक खातात, त्यामुळे शेतीतील हानिकारक कीटकांचे प्रमाण कमी होते. तसेच निसर्गातील अन्नसाखळी टिकवून ठेवण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यामुळे चिमण्यांचे अस्तित्व टिकवून ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

आजच्या आधुनिक घरामध्ये कौलारू घरे किंवा भेगा कमी असल्यामुळे चिमण्यांना घरटी बांधण्यासाठी जागा मिळत नाही. त्यामुळे आपण आपल्या घराजवळ किंवा अंगणात कृत्रिम घरटी (नेस्ट बॉक्स) लावू शकतो. तसेच घराच्या गच्चीवर, अंगणात किंवा झाडांवर धान्य टाकणे, छोट्या वाटीत पाणी ठेवणे अशा छोट्या उपाययोजनांमुळे चिमण्यांना मोठी मदत होऊ शकते.

विशेषतः उन्हाळ्याच्या दिवसात पाण्याची कमतरता भासत असल्यामुळे अनेक पक्ष्यांना पिण्यासाठी पाणी मिळत नाही. म्हणून प्रत्येकाने आपल्या घराच्या गच्चीवर, खिडकीजवळ किंवा अंगणात एखाद्या भांड्यात स्वच्छ पाणी ठेवावे. या छोट्याशा कृतीमुळे अनेक पक्ष्यांचे प्राण वाचू शकतात. तसेच परिसरात जास्तीत जास्त झाडे लावणे आणि त्यांचे संगोपन करणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जागतिक चिमणी दिवसाच्या निमित्ताने आपण सर्वांनी चिमण्यांचे संरक्षण करण्याचा संकल्प करणे आवश्यक आहे.



# मृत्यूच्या दारात गेलेल्या ८१ वर्षीय वृद्धाला डॉ. अर्जुन साबळे यांनी दिले जीवदान!

**परतूर । प्रतिनिधी -** वैद्यकीय तंत्रज्ञान आणि डॉक्टरांची समयसूचकता यांचा संगम झाल्यास कशा प्रकारे चमत्कार घडू शकतो, याचा प्रत्यय नुकताच परतूर येथील कोठाळकर मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये आला. हृदय आणि श्वसन दोन्ही बंद पडलेल्या ८१ वर्षीय रुग्णाला डॉक्टरांनी यशस्वीरित्या पुनरुज्जीवित करून मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले आहे.

**गुंतागुंतीची वैद्यकीय स्थिती**

सेलू येथील ८१ वर्षीय रुग्ण विठ्ठलराव शिंदे यांना शरीरातील साखर वारंवार कमी होणे (रिकरंट हायपोग्लिसेमिया श्वसनाचा त्रास आणि डाव्या पायाला झालेली गंभीर जखम अशा अनेक व्याधींमुळे कोठाळकर हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते.

**हृदय आणि श्वसन बंद पडले**

उपचार सुरू असतानाच अचानक रुग्णाला प्रचंड घाम येऊन छातीत मोठ्या प्रमाणात वेदना होत. त्यांचे हृदय आणि श्वसन दोन्ही पूर्णपणे बंद पडले. अशा परिस्थितीत रुग्ण वाचण्याची शक्यता अत्यंत कमी असते, मात्र डॉ. अर्जुन साबळे यांनी तत्काळ यंत्रणा हलवली.

**अशी रंगली मृत्यूशी झुंज**

डॉक्टरांनी क्षणाचाही विलंब न लावता आपत्कालीन उपचार सुरू केले: छातीवर दाब देऊन हृदय पुन्हा सुरू करण्यासाठी पंपिंग ची प्रक्रिया सुरू केली. जीवरक्षक औषधे: अॅट्रोपिन, अॅड्रेनालाईन आणि आयनोट्रॉप्स सारखी तातडीची इंजक्शन्स देण्यात आली. कृत्रिम श्वसन रुग्णाच्या श्वसननलिकेत ट्यूब टाकून अम्बू बॅगच्या साहाय्याने ऑक्सिजन आणि कृत्रिम श्वासोच्छवास सुरू केला.



या अथक प्रयत्नांनंतर रुग्णामध्ये जीव येण्याचे चिन्हे दिसू लागली, म्हणजेच त्यांचे बंद पडलेले हृदय पुन्हा धडधडू लागले.

**जालना ते परतूर: यशस्वी उपचार प्रवास** वीस मिनिटांच्या कृत्रिम श्वसनानंतर रुग्णाच्या हालचाली सुरू झाल्या. अधिक उपचारांसाठी त्यांना अम्बू बॅग आणि ऑक्सिजन सपोर्टसह जालना येथील संजीवनी हॉस्पिटलमध्ये व्हेंटिलेटरसाठी हलवण्यात आले. तेथे चार दिवस उपचार घेतल्यानंतर त्यांची प्रकृती स्थिर झाली. त्यानंतर पुन्हा कोठाळकर हॉस्पिटलमध्ये तीन दिवस देखरेखीखाली ठेवून, अखेर त्यांना पूर्णपणे ठणठणीत अवस्थेत डिस्चार्ज देण्यात आला.

**वैद्यकीय क्षेत्राकडून कौतुक**

८१ वर्षे वय आणि इतक्या गंभीर व्याधी असतानाही डॉ. अर्जुन साबळे यांनी दाखवलेले कौशल्य आणि तातडीच्या उपचारांमुळे विठ्ठलराव शिंदे यांना नव संजीवनी मिळाली आहे. या यशस्वी उपचारांमुळे नातेवाईकांनी कोठाळकर हॉस्पिटलचे आभार मानले असून संपूर्ण परिसरात डॉ. साबळे यांचे कौतुक होत आहे. आला. हृदय आणि श्वसन दोन्ही बंद पडलेल्या ८१ वर्षीय रुग्णाला डॉक्टरांनी यशस्वीरित्या पुनरुज्जीवित करून मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले आहे.

> ''कोठाळकर हॉस्पिटल, परतुर येथे उपचार सुरू असताना रुग्णाचे हृदय आणि श्वसन अचानक थांबले. ही परिस्थिती उद्भवताच वेळ न घालवता तातडीने हृदय पुनरुज्जीवन प्रक्रिया () सुरू करण्यात आली आणि आवश्यक ती तातडीची जीवरक्षक औषधे देण्यात आली. रुग्णाचे श्वसन सुरळीत ठेवण्यासाठी श्वसननलिकेत ट्युब टाकून() ऑक्सिजनद्वारे कृत्रिम श्वासोच्छवास देण्यात आला. या प्रयत्नांनंतर रुग्णाच्या हृदयाचे ठोके पुन्हा सुरू झाले. साधारण २० मिनिटांनंतर रुग्णाच्या शरीराची हालचाल सुरू झाली.
>
> **डॉ. अर्जुन साबळे, कोठाळकर हॉस्पिटल, परतूर**

> परतूर शहरात डॉक्टर अर्जुन साबळे यांनी श्वसन बंद पडलेल्या शिंदे रुग्णाला वेळेवर तात्काळ चांगले उपचार मिळाल्याने त्यांच्या तब्येतीत सुधारणा झाली यामुळे रुग्ण जीविताच्या धोक्याच्या बाहेर येऊन पूर्णपणे बरा झाला आहे.
>
> **डॉ. बळीराम बागल,**
> **संचालक, संजीवनी हॉस्पिटल**
> **जालना**

# १७ मोबाईल शोधण्यात परतुर पोलिसांना यश



**परतूर । प्रतिनिधी -** केंद्र सरकारच्या दूरसंचार व दळणवळण विभागाने हरवलेल्या आणि चोरीस गेलेल्या मोबाईलचा शोध घेण्यासाठी संचार साथी पोर्टल सुरू केले आहे.या पोर्टल अंतर्गत प्रणालीच्या प्रभावी वापरामुळे परतुर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील १७ मोबाईल शोधण्यात पोलिसांना यश आले असून हे मोबाईल मूळ मालकांना परत करण्यात आले आहेत परतूर पोलीस ठाण्यात हे यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे पोलीस ठाणे हद्दीतील चोरीस गेलेल्या किंवा हरवलेल्या मोबाईलच्या तक्रारी पोलिसांनी या पोर्टलवर अपलोड करून तांत्रिक पद्धतीने तपास केला यामध्ये २,४०,००० रुपये किमतीचे एकूण १७ मोबाईल शोधून काढण्यात परतुर पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदारांना यश मिळाले . शोधलेले मोबाईल उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे यांच्या हस्ते तक्रारदारांना सन्मानपूर्वक परत करण्यात आले हरवलेले मोबाईल पुन्हा मिळाल्यामुळे तक्रारदाराने समाधान व्यक्त करत पोलिसांचे आभार मानले व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांचे स्वागत केले. परतुर पोलीस ठाण्याच्या वतीने सर्व नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे. मोबाईल चोरीला गेल्यास किंवा हरवल्यास तात्काळ पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवावी त्यानंतर स्वतः चे आधार कार्ड आणि पोलीस फिर्यादीच्या प्रतीसह उएखठ पोर्टलचे कामकाज पाहणारे अमलदार किरण मोरे.व सुनील पवार. यांची भेट घेऊन आपली तक्रार पोर्टलवर ऑनलाइन नोंदवावी. सदरची यशस्वी कामगिरी पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल. अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी. उपविभागीय पोलीस अधिकारी, रामेश्वर रेंगे. यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, एस. बी.भागवत. अमलदार किरण मोरे. सुनील पवार. गोविंद पवार.विजय जाधव. ज्ञानेश्वर वाघ.व आयटी सेलचे सागर बाविस्कर. यांनी केले आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त लाडु महाप्रसाद वाटप समिती जाहीर

# अध्यक्षपदी सुधाकर निकाळजे, कार्याध्यक्ष इब्राहिम शेख



**जालना । प्रतिनिधी -** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११ ते रात्री १० वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा मस्तगड जूना जालना येथे १४ हजार १३५ लाडु महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी महाप्रसाद लाडुचे वाटप व जार पाणी वाटप निस्वार्थपणे करण्यात येते. याहीवर्षी १४,१३५ लाडु महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

या अनुषंगाने जूना जालना, कॅपीटल कॉम्प्लेक्स येथील सुरेश रत्नपारखे यांच्या संपर्क कार्यालयात आयोजित बैठकीत लाडु महाप्रसाद वाटप समितीची कार्यकारिणी बिनविरोध निवडण्यात आली. त्यामध्ये लाडु महाप्रसाद वाटप समितीच्या अध्यक्षपदी सुधाकर निकाळजे, कार्याध्यक्ष इब्राहिम शेख, उपाध्यक्ष संदीप हिवराळे, उपाध्यक्ष स्वप्निल गायकवाड, निखील पगारे, संजय इंगळे, फिलीप्स उगले,सुनिल रत्नपारखे, रंजित अरूण मगरे, प्रदिप मघाडे, अशविन अंबेकर, बाबा पठाण व्यवस्थापक सुरेश रत्नपारखे, सचिव बाबासाहेब वानखेडे, सहसचिव गोकुळ स्वामी, सुधाकर रत्नपारखे, संदीप बाबासाहेब वानखेडे, गौतम वानखेडे सदस्य दिवाकर मगरे,अॅड. अर्शद बागवान, योगेश रत्नपारखे, अमोल ठाकुर, मुन्ना भोसले, संतोष जमधडे, दीपक वैद्य, राहुल रायकर, कडुबा वाकीकर, अरविंद देशमुख, सुरेश खरात, अर्जुन पाथरकर, अॅड. संजय काळबांडे, शिवलाल घाडगे, नंदकिशोर जांगडे, सुरेश दांडगे, दिलीप मुळे,गणेश वाघमारे, रविंद्र हेलगट, रविंद्र मगरे, संदीप डोंगरे, देवानंद डोईफोडे, निखील पगारे, बाबुलाल महाराज (राजस्थान), नंदकुमार क्षिरसागर, विठ्ठल बोरकर, शिवाजी खांडेभराड, गजानन खांडेभराड, शांतीराम खांडेभराड, लक्ष्मीनारायण कदम, हरेश रत्नपारखे, शिवकुमार राऊत, अमोल धानुरे,सतीश खांडेभराड, राहूल मुळे, अमरदिप शिंदे, लक्ष्मण इधाटे, सचिन वानखेडे, निलेश वानखेडे, बाबासाहेब सोनवणे, नितीन इंगळे, धनंजय देशमुख, नितीन तायडे, राजेंद्र शिंदे, विनोद भालेराव ,प्रतिक लांडगे, रमेश मुळे, डॉ. श्रावण शेवाळे, सोनु वाघमारे, वंदना खांडेभराड, गंगुबाई वानखेडे, मंगला खांडेभराड, यांचा समावेश आहे.

## इराणला मदत करायला हवी - राज

**मुंबई -** आपल्या पक्षाला आज २० वर्ष झाली आहेत. २० वर्षानंतर १९ मार्चला गुढीपाडवा यावा, याला मी शुभसंकेत समजत असल्याचे मत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी व्यक्त केले. आपण महाराष्ट्रासाठी उभे आहोत. मी टाळ्यांसाठी बोलत नाही. महाराष्ट्राचे गतवैभव मिळवण्यासाठी, भविष्यात सत्ता घेणार हा माझा आत्मविश्वास आहे असे राज ठाकरे म्हणाले. यावेळी राज ठाकरे यांनी इराण इस्रायल युद्धावर देखील प्रतिक्रिया दिली. इराण इतकी वर्ष आपल्याला साथ देत होता, त्या इराणवर हल्ले होत असताना आपण इराणाणला साथ द्यायला हवी होती अशी भूमिका राज ठाकरे यांनी मांडली.

# पाणीवेस परिसरात नित्त्याचाच ट्रॅफिक जाम!

मनपा व पोलीस प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी





**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील पाणीवेस परिसर, शनी मंदिर, रेल्वे स्थानक परिसर आणि आसपासच्या प्रमुख चौकांमध्ये बुधवारी (दि. १८ मार्च) सायंकाळी सुमारे सात वाजताच्या सुमारास तब्बल दोन तास वाहतूक कोंडी झाली. या भीषण ट्रॅफिक जाममुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला असून प्रशासनाच्या निष्क्रियतेविरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, पाणीवेस परिसरात अतिक्रमण, रस्त्यांवरील अनधिकृत फ ेरीवाले, अव्यवस्थित पार्किंग आणि अरुंद रस्ते यामुळे वाहतुकीचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. विशेषतः जुना जालन्यातील शनी मंदिर आणि रेल्वे स्थानक परिसरात वाहनांची मोठी वर्दळ असते. मात्र, वाहतूक नियंत्रणासाठी कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नसल्याने परिस्थिती हाताबाहेर जात आहे.

या घटनेदरम्यान, वाहतूक पोलिसांचा पुरेसा बंदोबस्त नसल्याचे स्पष्ट झाले. परिणामी, नागरिकांनीच पुढाकार घेत वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. दोन तास चाललेल्या या कोंडीत अनेक रुग्णवाहिका, शालेय विद्यार्थी आणि कामावरून घरी परतणारे नागरिक अडकून पडले होते. दरम्यान, वाहतुकीदरम्यान एका वाहनाला धक्का लागल्याने दोन व्यक्तींमध्ये वाद निर्माण झाला. सुदैवाने मोठा अनर्थ टळला असला तरी, या घटनेमुळे परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली होती. महत्त्वाचे म्हणजे, शहरातील अतिक्रमण हटवण्याबाबत जालना महानगरपालिकेकडून वारंवार आश्वासने दिली जात आहेत. उपमहापौर राजेश राऊत यांनीही अतिक्रमण हटवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, प्रत्यक्षात कोणतीही कारवाई होत नसल्याने नागरिकांमध्ये संताप वाढत आहे. अतिक्रमण हटवण्याचे दिलेले आश्वासन केवळ कागदावरच राहिल्याची टीका नागरिकांकडून केली जात आहे.

दरम्यान, जालना महानगरपालिकेच्या स्वच्छता व आरोग्य सभापतीपदी कपिल भुरेवाल यांची नुकतीच निवड झाल्याने नागरिकांनी त्यांच्याकडून ठोस कारवाईची अपेक्षा व्यक्त केली आहे. पाणीवेससह शहरातील प्रमुख भागांतील अतिक्रमण तात्काळ हटवून वाहतुकीची समस्या कायमची सोडवावी, अशी मागणी जोर धरत आहे. नागरिकांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, जर लवकरात लवकर अतिक्रमण हटवून वाहतूक व्यवस्थेत सुधारणा केली नाही, तर आंदोलनाचा मार्ग अवलंबावा लागेल. प्रशासनाने तातडीने उपाययोजना करावी, अन्यथा वाहतूक कोंडीचा प्रश्न आणखी गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# जालना गणगोर उत्सवाला १०८ वर्षांची परंपरा

**जालना । प्रतिनिधी -** जालना येथील गणगौर उत्सवला सुमारे १०८ वर्षांची परंपरा असून, दरवर्षी प्रमाणे यंदाही हा उत्सव साजरा होणार असल्याची माहिती हरिप्रसाद देवीदान यांच्यासह विजय बगडिया आणि अर्जुन चौधरी यांनी दिली आहे.

यासंदर्भात त्यांनी सांगितले की, यंदा दि. २१, २२, २३ आणि २४ मार्च २०२६ असे सलग चार दिवस साजरा होणार आहे. गणगौर म्हणजे शंकर-पार्वती यांचा उत्सव आहे. गणगौर उत्सव हे होळीची पूजा केल्यावर त्याची राख आणि कोळशाच्या बारिक चूरा करून मुराड्या तयार करतात. नंतर त्यामध्ये ज्वारी उगवतात. कूमारी मुली त्यांची १६ दिवस पूजा अर्चना करतात. कारण त्यांना त्यांच्या जिवनासाठी योग्य जिवनसाथी (वर) मिळावे असा आहे. तसेच जिवन चांगल्या प्रकारे सार्थक व्हावे, यासाठी गुडी पाडवा झाल्यावर तिसऱ्या दिवशी मोठ्या गणगोर उत्सवाला सुरवात होते. यावर्षी दिनांक २१ ते २४ मार्च पर्यंत गणगोर उत्सव आहे. गणगोर उत्सव हा शहरातील, अमित हॉटेल येथे साजरा करण्यात येणार असून, दि. २१ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता गणगोर शोभा यात्रेची सुरवात ही काद्राबाद येथील अग्रवाल पंचायत भवन येथून होणार आहे. त्यानंतर दाना बाजारमार्गे नाथबाबा गल्ली येथील चोधरीजीच्या वाड्या ही शोभायात्रा काढण्यात येते. ती काद्राबाद मारवाड़ी गल्ली, नेहरू रोड, दाना बाजार, नया बाजार, राजेंद्र प्रसाद रोड या मुख्य मार्गावरुन अमित हॉटेल येथे पोहोचणार आहे. या सोहळ्यात बगड़िया परिवारतर्फे मोठे योगदान दिले जाते. या ठिकाणी खाण्या-पिण्याचे आणि लहान मुलांसाठी खेळण्याचे स्टॉलही लागतात. उत्सवात शेवटच्या दिवशी गणगौर (शिव-पार्वती) यांचे विवाह लावले जाते. या उत्सवात पूर्ण राजस्थानी समाज आणि इतर समाज मोठ्या प्रमाणांत सहभागी होत असून, गणगौर उत्सवाचा आनंद घेतात.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.